**फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी शासन मान्यता देण्याबाबत.**

**अमेपूर्व फोरमचे निरंत इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बोरमनी**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/प्र.क्र.५२१/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ जुलै, २०२५.

**संदर्भ** : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एन्जीसी/पीसीआय-मान्यता/६९६४ /४७४_२२, दि.१०.०६.२०२५.

**प्रस्तावना** : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्र शिक्षण यांच्या प्रस्तावानुसार, **अमेपूर्व फोरमचे निरंत इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बोरमनी** या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत सोबतच्या **"प्रपत्रामध्ये"** दर्शविल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१) सदर मान्यता ही कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३) शासनाने विहित केलेल्या, तसेच, फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस, संचालक, तंत्र शिक्षण यांच्यासोबत करारनामा करावा लागेल. तसेच, आवश्यक कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास, त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास शिक्षक, शिक्षकेतर व इतर तांत्रिक कर्मचारी, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या निकषाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. वेतन व भत्ते इ. बाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून तसेच, संस्थेविरुध्द विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच, फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१०) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२२.०२.२०१८ अन्वये विहित केलेले नोंदणी शुल्क संबंधित महाविद्यालय / संस्थेने भरणा केले नसेल, तर ते संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांनी संबंधित महाविद्यालय / संस्थेकडून भरणा करुन घ्यावे.

११) महाविद्यालयाने / संस्थेने सदर अभ्यासक्रमाकरीता, संबंधित विद्यापिठाचे संलग्नीकरण प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

३. या शासन मान्यतेनुसार उक्त संस्था / महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७२५११४८११४१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अजितकुमार थोरात)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४) कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५) संबंधित महाविद्यालय / संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६) निवडनस्ती (तांशि-४)

प्रपत्र

Higher and Technical Education Dept. G.R.No.Manyata-2025/C.R.521/TE-4, Dated : 25th July, 2025

List of Increase in Intake , New Course in existing Unaided Pharmacy Institute, Approved by PCI for A.Y. 2025-26

| Sr.No. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME | STATUS | PROGRAMME | UNIVERSITY NAME | LEVEL OF COURSE | MAIN COURSE NAME | COURSE NAME | Course Status | INTAKE APPROVED . for 2024-25 | INTAKE APPROVED for 2025-26 | VARIATION | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6964 | PCI 3323 | Amepurva Forums Nirant Institute of Pharmacy Boramani | Un-Aided | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere, Raigad | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Qaulity Assurance | Unaided | 0 | 15 | 15 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | Unaided | 0 | 15 | 15 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Chemistry | Unaided | 0 | 15 | 15 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Industrial Pharmacy | Unaided | 0 | 15 | 15 | New Course |

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या नावात बदल करण्यास शासन मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्रशिक्षण विभाग
## शासन निर्णय क्र.मान्यता-२०२३/प्र.क्र.५६/तांशि-४

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २८ जून, २०२३.

वाचा : १) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/पीसीआय-मान्यता/२०२३/५२६, दि.०८.०६.२०२३.
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/२०२३/५५०, दि.१९.०६.२०२३.

**प्रस्तावना :** फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्रशिक्षण यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.०१ व ०२ येथील पत्रांन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या ४ संस्थांच्या नावात बदल करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संस्थांच्या नावामध्ये बदल करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.:-

| अ.क्र. | डीटीई कोड | संस्थेचे सध्याचे नाव | संस्थेच्या नावातील प्रस्तावित बदल |
|---|---|---|---|
| १. | ५१९१ | पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कॉलेज ऑफ फार्मसी, अहमदनगर. | डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कॉलेज ऑफ फार्मसी, अहमदनगर. |
| २. | ६९६४ | अमेपूर्वा फोरमचे डॉ.अशोक गुजर कॉलेज ऑफ फार्मसी | अमेपूर्वा फोरमचे निरंत इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी. |
| ३. | ६९४२ | शारदाबाई पवार इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटीकल सायन्सेस ॲन्ड रिसर्च, शारदानगर, बारामती. | स्कूल ऑफ फार्मसी ॲन्ड रिसर्च सेंटर, बारामती |
| ४. | ५२७६ | लेट श्री.पंढरीनाथ छगनशेठ भंडारकर कॉलेज ऑफ डी.फार्मसी, अमळनेर, जि.जळगाव | लेट श्री.पंढरीनाथ छगनशेठ भंडारकर कॉलेज ऑफ डी.फार्मसी ॲन्ड लेट प्रोफ. आर.के.केले कॉलेज ऑफ बी.फार्मसी, अमळनेर, जि.जळगाव |

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०६२६१२३२५५०२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अनिल काटकर)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहसंचालक, संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३) संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५) संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६) फार्मसी कौंन्सिल ऑफ इंडिया, एनबीसी सेंटर, ३ रा मजला, प्लॉट नं.२, कम्युनिटी सेंटर, माँ आनंदमई मार्ग, ओखला फेज-१, नवी दिल्ली-११० ००२.
७) अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११०००१.
८) सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
९) निवड नस्ती/तांशि-४

Government Recognition
to start new Pharmacy Institution
(Permanently unaided) as per the
prior approval of Pharmacy Council
of India, New Delhi, for Academic
Year 2021-21

**Government of Maharashtra**
**Higher & Technical Education Department**
**Government Resolution No.TEM-2020/C.R.93/TE-4,**
Room No.441, Fourth Floor, Madam Kama Road
Hutatma Rajguru Chowk, Mumbai – 400032.
**Date 13th August, 2020.**

**Read:** 1. Letter issued by Director, Technical Education, Letter No.02/NGC/2020/478, Dated 6th July, 2020.

2. Letter issued by Director, Technical Education, Letter No.2/NGC/2020/544, dated 28th July 2020.

**Preface**:

Pharmacy Council of India, New Delhi has published list of approved pharmacy institutions with approval status and approved intake for academic year 2020-21 on its website (http://www.pci.nic.in/Decisions_EC_CC.html). According to Hon'ble Supreme Court order dated, 5th March 2020 in Transferred Petition (Civil) No. 87-101/2014, grant of approval to new pharmacy institutions will be in jurisdiction of Pharmacy Council of India, New Delhi, only. Accordingly, for Pharmacy institution recognition/approval of Pharmacy Council of India, New Delhi is mandatory while approval by All India Council of Technical Education, New Delhi, is optional. Thereby a proposal is presented regarding Government recognition / approval for Pharmacy Council of India, New Delhi recognized pharmacy institutions for academic year 2020-21. Accordingly recognition proposal is under consideration.

GOVT. OF INDIA
Kalindi D. Surate
Notary Govt. of India
Solapur
Reg. No. 15113
NOTARY

**Government Decision:**

Government recognition for the start of new Diploma / Degree Pharmacy Institutions as in Annexure "A" for Academic Year 2020-21 subject to fulfillment of all terms and conditions lay down as follows:

1) The sanction will be on the basis on permanent Un-Aided Condition.
2) The Institute / College have to sign agreement stating and accepting all the terms and conditions lay down by All India Council of Technical Education, New Delhi/ Pharmacy Council of India, New Delhi. Additionally, all the documents and formalities shall be completed satisfactory under the permission of Director, Technical Education, Government of Maharashtra.
3) Respective institute shall keep prescribed fixed deposit in joint account with Director, Technical Education, Government of Maharashtra and fulfillment of all legal formalities.
4) The admission for the Degree/Post degree shall be completed as per the rules and regulations set by Government of Maharashtra.
5) Respective Institution should prescribe fees as per Fees Regulating Authority; respective institute should not take excess fee as regulated by Fees Regulating Authority. In case of non-adherence, will be liable to action as per the Maharashtra Education Institution (Prohibition of Capitation fee) Act, 1987.
6) Institution should appoint and pay salary allowances to fulltime regular teaching faculty and other technical staff as per Government rules and regulation. Institution will be liable to strict action in case of complaint by teachers, staff and student regarding salary/allowance.
7) Institute should purchase books, journals, as per the UGC / University board guidelines. Institute should make available reading room facility for students. Also institute should make available all educational facilities like laboratory, library, class rooms etc. for students as per the norms and requirements of All India Council of Technical Education, New Delhi/ Pharmacy Council of India, New Delhi.

8) Institute should stringently follow orders of Hon'ble Supreme Court and Maharashtra prohibition of raging Act, 1999 against raging.
9) Other terms and conditions laid down by Director, Technical education, Government of Maharashtra, Mumbai, affiliated university and Maharashtra State Board of Technical Education will be applicable.
10) Institute should pay processing fee to by Director, Technical education, Government of Maharashtra, and if not, then Director, Technical Education should recover the same before final approval.
11) The above Government Resolution/ Decision is made available on the website of Government of Maharashtra viz. www.maharashtra.gov.in. with index number as 202008131502450008 as per the order of Governor. This resolution is digitally signed.

**Mr. Sanjay Audumbar Dharurkar**
**Upper Secretory, Government of Maharashtra.**

CC:

1. Director, Technical Education, Government of Maharashtra, Mumbai.
2. Joint Director, Technical Education, Regional Office Pune/ Nagpur/ Nashik/ Mumbai/ Aurangabad/ Amravati (through Director, Technical Education)
3. Vice Chancellor, Savitribai Phule Pune University, Pune (through Director, Technical Education)
4. Vice Chancellor, Rashtra Sant Tukdoji Maharaj University, Nagpur (through Director, Technical Education).
5. Vice Chancellor, Dr. Babasaheb Technological University, Lonere, Raigad, (through Director, Technical Education)
6. Chief Secretory, Social Justice & Special Assistance Department, Mumbai.
7. Chief Secretory, Tribal Development Department, Mumbai.

Translated By

Kalindi D. Surate
Advocate & Notery
Notary Govt. of India
117/85, Umanagari, Murarji Peth, Solapur
Dist. Solapur - 413002. (Maharashtra)
Page No. ............ Date 22/ / /202

GOVT. OF INDIA
Kalindi D. Surate
Notary Govt. of India
Solapur
(Maharashtra State)
Reg. No. 15113
NOTARY

ATTESTED
TRUE COPY
KALINDI D. SURATE
Notary, Govt. of India
(Maharashtra)
Reg. No.
Reg. No. 15113

Annexure A

Higher Technical Education Department, Government Resolution No TEM-2020/C.R.[illegible]/TE-4, Dated 13th August, 2020

List of New Pharmacy Institute [Approved by PCI A.Y. 2020-21]

| Sr no | PCI Code | Region | District | Name of the Trust with Address & Phone Numbers | Name & Address of the Proposed Institute & Phone Numbers | Institutes Status | PCI Approval | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | PCI-4244 | Mumbai | Thane | KAI. BHASKARRAO MAHAJAN SAMAJIK, SHAIKSHNIK VA SANSKRUTIK SANSTHA KALYAN, A-103, SURESH TOWER, RAMBAUG, KALYAN (W) | INDALA INSTITUTE OF PHARMACY, NEAR HP GAGANGIRI PETROL PUMP, KALYAN-MURBAD ROAD, BAPSAI, TAL - KALYAN (421103) | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 60 |
| | | | | | | | | Diploma Courses | 60 |
| 2 | PCI-1210 | Mumbai | Raigad | TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, VIDYAPEETH BHAVAN, MUKUNDNAGAR, GULTEKADI, PUNE-37 | Lokmanya Tilak Institute of Pharmacy, Sector No.14, Plot No. 3 Near Raghunath Vihar CHS, Jeevan Jyothi Path, Kharghar, Tal Panvel, Dist Raigad 410210 | Un Aided | Pharmacy | B.Pharm | 60 |
| 3 | PCI-3782 | Pune | Kolhapur | ROSHANBI SHAMANJI EDUCATION SPORTS AND WELFARE SOCIETY, RAJESHRI SHAU NAGAR,BEHIND NEEL KAMAL HOTEL NEAR,AMBEDKAR HALL CORNER | RIYAJBHAI SHAMANJI COLLEGE OF PHARMACY, A/P-KALBHAIRI ROAD GADHINGLAJ | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 100 |
| | | | | | | | | Diploma Courses | 60 |

Annexure A
Higher Technical Education Department, Government Resolution No. TEM-2020/C.R.93/TE-4, Dated 13th August, 2020
List of New Pharmacy Institute [Approved by PCI A.Y. 2020-21]

| Sr no | PCI Code | Region | District | Name of the Trust with Address & Phone Numbers | Name & Address of the Proposed Institute & Phone Numbers | Institutes Status | PCI Approval | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 4 | PCI-1209 | Pune | Pune | TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, VIDYAPEETH BHAVAN, MUKUNDNAGAR, GULTEKADI, PUNE-37 | Tilak Maharashtra Vidyapeeth's Lokmanya Tilak Institute Of Pharmaceutical Sciences., Tilak Maharashtra Vidyapeeth's Lokmanya Tilak Institute Of Pharmaceutical Sciences.Main Campus, Gultekadi Pune-411037 | Un Aided | B.Pharm | Degree Courses | 60 |
| 5 | PCI-3323 | Pune | Solapur | AMEPURVA FORUM. Reg. Office: 6-31 SWAPNIL, SCHEME 11, SECTOR-21, YAMUNA NAGAR, NIGDI, PUNE-411044.INSTITUTE ADDRESS: GAT NO. 503, NH-09, A/P BORAMANI, TAL: DAKSHIN SOLAPUR, DIST: SOLAPUR 413002 | AMEPURVA FORUM'S DR. ASHOK GUJAR COLLEGE OF PHARMACY, GAT NO. 503, NH 9, NEAR PRIMARY HEALTH CENTER,A/P BORAMANI, TAL. DAKSHIN SOLAPUR,DIST. SOLAPUR MAHARASHTRA | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 100 |
| | | | | | | | Pharmacy | Diploma Courses | 60 |
| 6 | PCI-3077 | Pune | Pune | DNYAN KALA KRIDA & KRUSHIPRATISHTHAN, PHADTARE WASTI, WALCHANDNAGAR,TALUKA - INDAPUR, DISTRICT - PUNE | Late.Laxmibai Phadtare college of Pharmacy, KALAMB WALCHANDNATGAR | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 60 |
| | | | | | | | Pharmacy | Diploma Courses | 60 |
| 7 | PCI-3407 | Aurangabad | Aurangabad | Rashtriya College of Pharmacy, 14 Jaitapur Road, At post Hatnoor Taluka Kannad District Aurangabad-431103 (Maharashtra) | Rashtriya College of Pharmacy, 14 Jaitapur Road, At post Hatnoor Taluka Kannad District Aurangabad-431103 (Maharashtra) | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 60 |
| | | | | | | | | Diploma Courses | 60 |

Translated By
Kalindi D. Surate
Advocate & Notery
Notary Govt. of India
117/85, Umanagari, Murarji Peth, Solapur
Dist. Solapur - 413002. (Maharashtra)
Page No. Date

GOVT. OF INDIA NOTARY
Kalindi D. Surate
Notary Govt. of India
Solapur
(Maharashtra State)
Reg. No. 15113

ATTESTED
TRUE COPY
KALINDI D. SURATE
Notary, Govt. of India
(Maharashtra)
Reg. No.
Reg. No. 15113

**फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था कायम विनाअनुदानित तत्वावर सुरू करण्यासाठी शासन मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. टीईएम-२०२०/प्र.क्र.९३ /तांशि-४,**
खो.क्र.४४१, चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२०.

**वाचा** : १) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/२०२०/४७८, दिनांक ६ जुलै, २०२०
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/२०२०/५४४, दिनांक २८ जुलै, २०२०

**प्रस्तावना :**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांनी त्यांचे संकेतस्थळावर [http:// www.pci.nic.in/Decisions_EC_CC.html] शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता देशातील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास मान्यतेचे इतीवृत्त / याद्या प्रसिध्द केल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने ट्रान्सफर्ड पिटीशन (सिव्हील) क्र. ८७-१०१/२०१४ संदर्भात दि. ०५.०३.२०२० रोजीच्या न्यायनिर्णयान्वये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांची मान्यता फार्मसी कौंसिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांचे प्राधिकारात असल्याच्या निर्णय दिला आहे. सबब औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांना फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांची मान्यता अनिवार्य असून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता ऐच्छिक आहे. यास्तव राज्यात फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे मान्यतेच्या आधारे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास अनुसरुन शासन मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये सोबतच्या Annexture “A” मध्ये दर्शविल्यानुसार नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

४) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

५) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

६) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके शिखर संस्थेच्या/ विद्यापीठाच्या / मंडळाच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

८) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

९) याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई ,संबंधित विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१०) ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतिम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

११) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२००८१३१५०२४५०००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: CN = SANJAY AUDUMBAR DHARURKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT
Date: 2020.08.14 13:09:52 +05'30'

**( संजय औ. धारुरकर )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे/ नागपूर /नाशिक /मुंबई/ औरंगाबाद /अमरावती (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
६. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

८. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
९. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
१०. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
११. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कम्बाईन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-ए-गालिब मार्ग, नवी दिल्ली -११०००२
१२. संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
१३. निवड नस्ती / तांशि-४.

**Annexure A**
**Higher Technical Education Department, Government Resolution No.TEM-2020/C.R.93/TE-4, Dated 13th August, 2020**
**List of New Pharmacy Institute [Approved by PCI A.Y. 2020-21]**

| Sr no | PCI Code | Region | District | Name of the Trust with Address & Phone Numbers | Name & Address of the Proposed Institute & Phone Numbers | Institutes Status | PCI Approval | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | PCI-4244 | Mumbai | Thane | KAI. BHASKARRAO MAHAJAN SAMAJIK, SHAIKSHNIK VA SANSKRUTIK SANSTHA KALYAN, A-103, SURESH TOWER, RAMBAUG, KALYAN (W) | INDALA INSTITUTE OF PHARMACY, NEAR HP GAGANGIRI PETROL PUMP, KALYAN-MURBAD ROAD, BAPSAI, TAL - KALYAN (421103) | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 60 |
| | | | | | | | | Diploma Courses | 60 |
| 2 | PCI-1210 | Mumbai | Raigad | TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, VIDYAPEETH BHAVAN, MUKUNDNAGAR, GULTEKADI, PUNE-37 | Lokmanya Tilak Institute of Pharmacy, Sector No.14, Plot No. 3 Near Raghunath Vihar CHS, Jeevan Jyothi Path, Kharghar, Tal Panvel, Dist Raigad 410210 | Un Aided | Pharmacy | B.Pharm | 60 |
| 3 | PCI-3782 | Pune | Kolhapur | ROSHANBI SHAMANJI EDUCATION SPORTS AND WELFARE SOCIETY, RAJESHRI SHAU NAGAR,BEHIND NEEL KAMAL HOTEL NEAR,AMBEDKAR HALL CORNER | RIYAJBHAI SHAMANJI COLLEGE OF PHARMACY, A/P-KALBHAIRI ROAD GADHINGLAJ | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 100 |
| | | | | | | | | Diploma Courses | 60 |

**Annexure A**
**Higher Technical Education Department, Government Resolution No.TEM-2020/C.R.93/TE-4, Dated 13th August, 2020**
**List of New Pharmacy Institute [Approved by PCI A.Y. 2020-21]**

| Sr no | PCI Code | Region | District | Name of the Trust with Address & Phone Numbers | Name & Address of the Proposed Institute & Phone Numbers | Institutes Status | PCI Approval | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 4 | PCI-1209 | Pune | Pune | TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, VIDYAPEETH BHAVAN, MUKUNDNAGAR, GULTEKADI, PUNE-37 | Tilak Maharashtra Vidyapeeth's Lokmanya Tilak Institute Of Pharmaceutical Sciences., Tilak Maharashtra Vidyapeeth's Lokmanya Tilak Institute Of Pharmaceutical Sciences.Main Campus, Gultekadi Pune-411037 | Un Aided | B.Pharm | Degree Courses | 60 |
| 5 | PCI-3323 | Pune | Solapur | AMEPURVA FORUM, Reg. Office: 6-31 SWAPNIL, SCHEME 11, SECTOR-21, YAMUNA NAGAR, NIGDI, PUNE-411044.INSTITUTE ADDRESS: GAT NO. 503, NH-09, A/P BORAMANI, TAL: DAKSHIN SOLAPUR, DIST: SOLAPUR 413002 | AMEPURVA FORUM'S DR. ASHOK GUJAR COLLEGE OF PHARMACY, GAT NO. 503, NH 9, NEAR PRIMARY HEALTH CENTER,A/P BORAMANI, TAL. DAKSHIN SOLAPUR,DIST. SOLAPUR MAHARASHTRA | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 100 |
| | | | | | | | Pharmacy | Diploma Courses | 60 |
| 6 | PCI-3077 | Pune | Pune | DNYAN KALA KRIDA & KRUSHIPRATISHTHAN, PHADTARE WASTI, WALCHANDNAGAR,TALUKA - INDAPUR, DISTRICT - PUNE | Late.Laxmibai Phadtare college of Pharmacy, KALAMB WALCHANDNATGAR | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 60 |
| | | | | | | | Pharmacy | Diploma Courses | 60 |
| 7 | PCI-3407 | Aurangabad | Aurangabad | Rashtriya College of Pharmacy, 14 Jaitapur Road, At post Hatnoor Taluka Kannad District Aurangabad-431103 (Maharashtra) | Rashtriya College of Pharmacy, 14 Jaitapur Road, At post Hatnoor Taluka Kannad District Aurangabad-431103 (Maharashtra) | Un Aided | Pharmacy | Degree Courses | 60 |
| | | | | | | | | Diploma Courses | 60 |